# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ०७/२०१२-१३/ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. शामराव नाथा माने,<br>मु.पो. बिरनाळ, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. शामराव नाथा माने, मु.पो. बिरनाळ, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी जत उप विभाग, कवठे महांकाळ विभाग विरुध्द तक्रार दि. १२.४.२०१२ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using SmartPDFCreator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तक्रारदार ग्राहकाने आपली शेत जमीन गट क्र. ११ मध्ये ३ अश्वशक्ती नवीन शेतीपंप वीज जोडणी मिळावी यासाठी चलन रु. २६०९/- पावती क्र. ६६५१० दि. ८.२.२००७ रोजी भरले आहे. अर्जदार हे शासनाच्या जवाहर योजनेचे लाभार्थी आहेत. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. ८.२.२०१२ रोजी तक्रार दाखल केली त्यामध्ये आदेश झाले नाहीत. मंचाकडून अपेक्षित मदत - वीज जोडणी देणे कलम ४.५ व विलंब भरपाई या बाबत कृती मानके विनियमामध्ये जी तरतूद आहे त्याची अंमलबजावणी व आदेश व्हावा अशी मागणी केली आहे. तक्रारीसोबत पावतीची झेरॉक्स जोडली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. २.५.२०१२ च्या लेखी अहवालात अर्जदार ग्राहक यांनी नवीन शेतीपंप वीज जोडणीसाठी दि. ८.२.२००७ रोजी चलन भरल्याचे मान्य केले आहे. परंतु त्यांनी विद्युत संच मांडणी करुन त्याचा चाचणी अहवाल सादर केलेला नव्हता. त्यांना चाचणी अहवाल देण्याबाबत बऱ्याचवेळा लेखी व तोंडी सूचना देण्यात आल्या होत्या, परंतु चाचणी अहवाल सादर केला नाही. म्हणून त्यांचे नांव रद्द करण्यात आले असून त्यांना कनेक्शन देण्यात आले नाही असे म्हटले आहे. नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. ९.५.२०१२ ला सुनावणीस घेतली असतां, तक्रारदार ग्राहक गैरहजर, प्रतिनिधी नेमले नाहीत. वि.प.तर्फे श्री. मैलापुरे, सहाय्यक अभियंता, श्री. अे.एस. भोसले, सहाय्यक अभियंता उपस्थित. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी अंतर्गत कक्ष येथे अर्ज केल्याचे म्हटले आहे, परंतु असा कुठलाही अर्ज केलेला नाही. दि. ८.२.२००७ रोजी ग्राहकाकडून चलनाचे पैसे भरुन घेतल्याचे मान्य आहे. पेपरला नोटीस देऊन ग्राहकाचे नांव कमी केले असे सांगण्याचा प्रयत्न केला. दि. ३१.५.२०१२ पर्यंत पुरावा हजर करतो असे सांगितले. तडजोड करुन वीज जोडणी देणार असे मंचासमोर सांागितले, परंतु दि. ४.६.२०१२ पर्यंत कुठलीही कागदपत्रे दाखल केली नाहीत, तसेच वीज जोडणी दिली किंवा तडजोड केली याचा अहवाल मंचासमोर दाखल केला नाही.

खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाने मागणी केलेप्रमाणे वीज जोडणी देण्याचे आदेश व विलंबापोटी भरपाई मंजूर करणे योग्य होईल काय ?

२) उत्तर : होय

## कारणमिमांसा

अर्जदार ग्राहक हा जवाहर योजनेचा लाभार्थी आहे त्यासाठी पंचायत समिती जत यांचे दि. १५.७.२००६ चे सहाय्यक अभियंता, म.रा.वि. मंडळ, जत यांना लिहीलेले पत्र दाखल केले आहे. त्यानंतर दि. ८.२.२००७ ला चलन भरले आहे. ग्राहकाने चाचणी अहवाल सादर केला नाही त्यासाठी त्यांना बऱ्याचवेळा लेखी व तोंडी सूचना देण्यात आल्या होत्या, परंतु चाचणी अहवाल सादर केला नाही म्हणून त्यांचे नांव रद्द करण्यात आले असून त्यांना कनेक्शन देण्यात आले नाही असा बचाव घेतला आहे, परंतु ग्राहकास लेखी सूचना दिल्याबद्दल पुरावा मंचासमोर हजर केला नाही.

वि.प.ने मुदत घेऊनही पुरावा दिला नाही, उलट त्वरित वीज जोडणी देण्यासाठी तडजोड करीत आहे असे मंचासमोर सांगितले, परंतु काय कार्यवाही केली ते दि. ४.६.२०१२ पर्यंत मंचास कळविले नाही. एकंदर विलंबासाठी वि.प.चा बचाव, अर्जदार ग्राहकाने चाचणी अहवाल दिला नाही म्हणून त्यांचे नांव रद्द करण्यात आले असून त्यांना वीज जोडणी देण्यात आले नाही, हा ग्राह्य धरता येणार नाही, कारण ग्राहक हा जवाहर योजनेचा लाभार्थी आहे. त्यांनी चलनाचे पैसे भरुन जवळजवळ ५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला आहे. तसेच चाचणी अहवाल सादर करण्याबाबत ग्राहकास लेखी नोटीस दिली किंवा नाही याबद्दल संदिग्धता दिसून येते, मुदत घेऊनही मुदतीत खुलासा केला नाही. केवळ भरपाई टाळण्यासाठी चाचणी अहवाल दिला नाही म्हणून नाव कमी केले असा बचाव घेतला आहे, या शिवाय दुसरा अर्थ निघू शकत नाही असे मंचाचे मत आहे. त्यामुळे भरपाई मान्य करु नये म्हणून वि.प.ने दिलेली कारणे संयुक्तिक नाहीत. कृती मानके विनियम २००५ चे कलम ४.५ नुसार वितरण वाहिनी विस्तार असल्याने अर्जदार ग्राहकास ३ महिन्यात वीज जोडणी देणे आवश्यक होते. ती न दिल्याने झालेल्या विलंबापोटी कृती मानके विनियम व परिशिष्ट अ नुसार प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे भरपाई देण्यास वितरण कंपनी जबाबदार आहे व ग्राहक अशी भरपाई मिळण्यास हक्कदार आहे. ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ कलम ८.२ नुसार ग्राहकाचे गाऱ्हाणे ठराविक मुदतीत दूर करण्याचे आदेश मंच देऊ शकतो. त्यानुसार प्रस्तुत ग्राहकास दि. ५.९.२०१२ पर्यंत वीज जोडणी द्यावी व त्याचा अहवाल मंचास द्यावा. मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे.

वितरण कंपनीच्या स्थानिक अधिकाऱ्यांना भरपूर वेळ देऊन व वारंवार सूचना दिल्यानंतर दि. ३.७.२०१२ ला तक्रारदार यांस विद्युत पुरवठा दिल्याचे पत्र मंचात दाखल केले. या पत्रासोबत ग्राहकाचे मंचाला अग्रेषित केलेले पत्र जोडले आहे. त्यामध्ये दि.३.७.२०१२ ला वीज जोडणी मिळाली आहे, मीटर क्रमांकही मिळाला दिला आहे. वि.प.कडून कुठल्याही प्रकारची भरपाई नको आहे हे मी स्वखुषीने लिहून देत आहे असे म्हटले आहे. तक्रारदाराची अर्जावरील सही व अनुसूची अ मधील सही यामध्ये साम्य आहे असे मंचाचे मत आहे. या ठिकाणी ग्राहकाने प्रतिनिधी नेमला नाही. सुनावणीवेळी ग्राहक अथवा प्रतिनिधी हजर नाही.

दि. १२.४.२०१२ ला तक्रार मंचात प्राप्त झाल्यानंतर दि. २.५.२०१२ पर्यंत लेखी अहवाल देण्याची नोटीस वि.प.ला देण्यात आली होती. प्रस्तुत केसची सुनावणी दि. ९.५.२०१२ ला ठेवण्यात आली. त्यापूर्वी दि. २.५.२०१२ व २.६.२०१२ ला वि.प.ला लेखी अहवाल प्राप्त झाला. वि.प.च्या स्थानिक अधिकाऱ्यांनी ग्राहकाचे नांव यादीतून कमी केल्याचा अहवाल देण्यास वेळावेळी मुदत घेतली. शेवटी वीज जोडणीचा अहवाल व त्यासोबत वि.प.कडून कुठल्याही प्रकरची भरपाई नको असा उल्लेख असलेले ग्राहकाचे पत्र जोडले आहे. त्यामुळे तक्रार दोन महिन्यात निकाली काढता आली नाही. खालील प्रमाणे आदेश -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनी जत उप विभाग, कवठे महांकाळ विभाग यांनी तक्रारदार ग्राहकास दि. ५.९.२०१२ पर्यंत त्यांची शेत जमीन गट क्र. ११ येथे शेतीपंपास नवीन वीज जोडणी देवून विद्युत पुरवठा करावा व त्याचा अहवाल मंचास सादर करावा.

३) वितरण कंपनीच्या दि. ३.७.२०१२ च्या पत्रासोबत ग्राहकाचे मंचाला अग्रेषित केलेल्या दि. ३.७.२०१२ च्या पत्रानुसार भरपाईची मागणी सोडून देण्यात आली असल्याने भरपाई रकमेबाबत आदेश दिला नाही, त्यामुळे समायोजनाचा प्रश्न येत नाही.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using SmartPDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com